# REPORT

**DEPARTMENT OF ECONOMICS, HISTORY, POLITICAL SCIENCE & PALI-PRAKRIT**

**COLLABORATION WITH SAMNET, NEW DELHI AND GHARELU KAMGAR SAYKAL CLUB, NAGPUR**

**TOPIC: *VAHTUKICHE SHASTRA*:: WORKSHOP: 11-01-2019**

**SPEAKERS: DR. RAJENDRA RAVI, SUSTAINABLE URBAN MOBILITY NETWORK, NEW DELHI**

**MR.RAVINDRA KASKHEDIKAR, SECRETARY JANAAKROSH, NAGPUR**

**MR. VILAS BHONGADE, SOCIAL ACTIVIST, NAGPUR**

**MR. DILIP MUKEWAR, JOINT SECRETARY, JANAAKROSH, NAGPUR**

**MR. ANIRUDHA RAICHA, NAGPUR**

**DR. AMBEDKAR COLLEGE**

NAAC REACCREDITED WITH 'A' GRADE
COLLEGE WITH POTENTIAL FOR EXCELLENCE
DEEKSHABHOOMI, NAGPUR-440 010. (M.S.)
▪ PH. : 9579755443 ▪ E-MAIL dacn_ngp@rediffmail com
▪ VISIT US AT : www.dacn.in

No. AC / ___________ / _____

दिनांक: ०७/०१/२०१९

**प्रसिध्दीसाठी**

**अर्थशास्त्र, इतिहास, पाली, प्राकृत व राज्यशास्त्र विभाग**
**व**
**समनेट, घरेलु कामगार सायकल क्लब आयोजित कार्यशाळा शुक्रवार दि. ११ जानेवारी २०१९**
**वेळ सकाळी १० ते १ पर्यन्त**

**स्थळ :— ना.ह. कुंभारे सभागृह डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर.**
**विषय : वाहतुकीचे शास्त्र**

**Sustainable Urban Mobility Network** 'समनेट' हे संघटन मागील अनेक वर्षापासून वाहतुकीच्या विषयाने देशात अध्ययन व काम करते. त्यांच्या असे निरिक्षणात आले आहे की शहरांमध्ये उपलब्ध असलेल्या रस्त्या—हमरस्त्यांवर मोठे ट्रक्स—ट्रेलर्स, जीप—कार व स्कुटर्स, मोटरसायकल्स यांना एक विशिष्ट प्रकारचा वाव देण्यात आला आहे. रस्ते करताना या सगळयांचा विचार करण्यात येत आहे असंघटित क्षेत्रामध्ये काम करणारे मजूर, कारागीर, विद्यार्थी—विद्यार्थीनी व व्यायाम करणारे नागरिक हे बहुदा सायकलीचाच वापर करतात. याशिवाय रिक्शाचालकांच्या माध्यमाने नागरिक या रस्त्यांवर वाहतुक करतात. यादृष्टीने सायकल, रिक्शाचालक, हाथठेले यांना या मोठया रस्त्यांवर कुठेही विशिष्ट वाव दिसून येत नाही. त्यामुळे या एका अत्यंत महत्वाच्या मुद्यांसाठी शासकीय धोरणांमध्ये बदल करण्याच्या दृष्टीने एका लोकचळवळीची नितांत गरज आहे. यासंबंधीची जागरूकता विद्यार्थी व नागरिकांमध्ये निर्माण करण्याच्या दृष्टीने वाहतुकीचे शास्त्र समजून घेण्याच्य दृष्टीने ही कार्यशाळा आयोजित आहे. तरी आपण अगत्याने या कार्यशाळेत उपस्थित राहावे असा आग्रह आहे.

**प्रमुख सहभागी**

डॉ. राजेंद्र रवी समनेट, नवी दिल्ली
मा. अखिलेश हळवे, मेट्रो कॉर्पोरेशन नागपूर
मा. विलास भालेकर, ऑटो युनियन नागपूर
मा. नरेश वाहने, फुटपाथ पुस्तक विक्रेता संघटना, नागपूर
मा. चंदा आंभोरे, घरकामगार संघटना, नागपूर.

**विनीत**

**डॉ. गौतम कांबळे**
अर्थशास्त्र विभाग
डॉ. आंबेडकर महाविद्यालय

**डॉ. अविनाश फुलझेले**
इतिहास विभाग
डॉ. आंबेडकर महाविद्यालय

**डॉ. मोहन वानखडे**
पाली—प्राकृत विभाग
डॉ. आंबेडकर महाविद्यालय

**प्रा. विद्या चौरपगार**
राज्यशास्त्र विभाग
डॉ. आंबेडकर महाविद्यालय

**विलास भोंगाडे**
समनेट व
घरेलू कामगार सायकल क्लब नागपूर

**संपर्क :— विलास भोंगाडे — ९८९०३३६८७३**

---

मा. संपादक
दैनिक————————————
नागपूर.

महोदय,
वरील वृत्तास आपल्या लोकाभिमुख वर्तमानपत्रात उचित प्रसिध्दी द्यावी व कार्यक्रमास आपला प्रतिनिधी पाठवावा, ही विनंती.

आपला

(डॉ. पी. सी. पवार)
**PRINCIPAL**
**DR. AMBEDKAR COLLEGE**
**NAGPUR**

समनेट (**SUSTAINABLE URBAN MOBILITY NETWORK**) हे संघटन मागील अनेक वर्षापासून वाहतुकीच्या विषयाने देशात अध्ययन व काम करते. या विषयी ची माहिती विध्यार्थ्याना व्हावी म्हणून हा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यशाळेत डॉ. राजेंद्र रवी, समनेट, नवी दिल्ली हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. त्यांनी भारतातील रस्ते वाहतुकी मध्ये पायी चालण्या करिता तसेच सायकल, रिक्षाचालक, हाथठेले, यांना कुठेच वाव नाही. शहरातील हमरस्ते नागरिकांना एकमेकांची विचारपूस करण्यासाठी असतात पण असे चित्र देशात कुठेच दिसत नाही. असे मत त्यांनी व्यक्त केले. नरेश वाहणे, फुटपाथ विक्रेता संघ, नागपूर यांनी रस्त्यावर पुस्तके विकायची म्हणजे जीवावर बेतण्यासारखी परिस्थिती आहे. शासन पुस्तक विक्रेत्यांना हक्काची जागा उपलब्ध करून देण्यात उदासीन आहे असे मत व्यक्त केले.

चंदा आंभोरे, घरेलू कामगार संघटना, नागपूर म्हणाल्या की , जेव्हा घरेलू स्त्री कामगार रस्त्याने सायकल वर कामाला जातात तेव्हा रस्त्यावरील वर्दळीत त्या अपमानित होतात. सायकलीने कामाला जात असताना स्त्रीयांसाठी सुरक्षित जागा नसते. त्याशिवाय सायकल चालवणे कमीपणाचे समजले जात असल्यामुळे रस्त्यांवर स्त्री कामगारांकडे दुर्लक्ष केल्या जाते. खरे तर सायकल चालविणे हे प्रकृतीसाठी अतिशय आरोग्यदायी आहे तरीसुद्धा रस्त्यांवर सायकल चालकांना कुठेच हक्काची वाट दिसत नाही असे मत त्यांनी मांडले. रविंद्र कासखेडीकर सचिव जनआक्रोश, नागपूर यांनी आपले मत व्यक्त करताना असे म्हटले की, मोटार-गाडयांची वाढती संख्या व पेट्रोल चे दर विचारात घेतले तर सायकल चालविणे किती महत्वाचे आहे हे लक्षात येते. तेव्हा सर्वांनी सायकलींचा जास्त वापर करावा असे सर्वांना त्यांनी आवाहन केले.

अनिरुद्ध रेईचा यांनी सायकल चालविणे केवळ स्वतःच्या प्रकृतीसाठी महत्वाचे नसून राष्ट्रीय विकासासाठी फार महत्वाचे आहे असे स्पष्ट केले. त्यांनी स्वतःचा अनुभव सांगताना म्हणाले की, आज तरुणा मध्ये सायकली चालविण्यात जागृती येत असून त्यासाठी ते स्वतः पुढाकार घेऊन सायकलींच्या स्पर्धा आयोजित करतात व तरुणांना त्यासाठी प्रेरित करतात . महेश गुप्ता, संयुक्त महाप्रबंधक सिविल महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड , नागपूर यांनी भारतातील मेट्रो वाहतुकीचा अभ्यास सादर करताना असे म्हटले की, रस्ते वाहतुकीचे सर्व नियम पाळणे हे मेट्रोचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी मेट्रोने भाडे तत्वावर नागरिकांना स्वस्त दरात सायकली उपलब्ध करून देण्याचा आपला संकल्प जाहीर केला. यामुळे रस्ते वाहतुकीची कोंडी तर सुटेलच पण त्याबरोबर पर्यावरणाचेही संरक्षन होईल.

डॉ. गौतम कांबळे यांनी जगामधील जर्मनी, जपान, डेन्मार्क, अमेरीका या देशात लोकसंख्या कमी असून आणि प्रतिव्यक्ती उत्पन्न बरेच जास्त असूनही तिथे सायकल चा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो म्हणून तिथे सायकलस्वार आणि पायी चालने याला तुलनेने अधिक प्रतिष्ठा व सन्मान दिला जातो. मात्र भारताचा विचार केल्यास गरज असूनही इथे गरीब लोकच सायकलीचा वापर करीत असतात म्हणून त्यांना समाज मान्यता व प्रतिष्ठा मिळत नाही. हे वाईट चित्र बदलने अत्यंत गरजेचे असून त्यासाठी भारतीय समाजात एका मोठ्या जन चळवळीची आवश्यकता आहे असे मत प्रगट केले. डॉ. अविनाश फुलझेले,इतिहास विभाग प्रमुख यांनी पाहुण्यांचे स्वागत केले . तर विलास भोंगाडे , सामाजिक कार्यकर्ता, नागपूर यांनी प्रास्ताविक व परिचय करून कार्यक्रमाची

सुरुवात केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विद्या चौरपगार राज्यशास्त्र विभाग प्रमुख यांनी केले. तर डॉ. मोहन वानखेडे, पाली-प्राकृत विभाग प्रमुख यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाला विद्यार्थी, प्राध्यापक व नागरिक बहुसंखेने उपस्थित होते.













******REPORT CONCLUDED******